# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

## परिपत्रक क्र. आस्था/आरओ/04/२०२१

संदर्भ:- उपायुक्त, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचे पत्र क्र. रानिआ/ग्रापंनि-२०२०/प्र.क्र.०१/का-८, दि. ०४-०१-२०२१.

या परिपत्रकाद्वारे सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख यांना कळविण्यात येते की, ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणुका २०२०-२०२१ अनुषंगाने महाराष्ट्र राज्यातील ३४ जिल्यांमध्ये शुक्रवार दि. १५-०१-२०२१ रोजी मतदान होणार आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या संदर्भीय पत्रान्वये ग्रामपंचायत मतदानाच्या दिवशी संबंधित ग्रामपंचायतींमधील मतदारांना मतदानाचा हक्क बजावता येण्याच्या दृष्टीने भरपगारी सुटी/ विशेष सवलत देण्याबाबत नमुद आहे. सदर पत्राची प्रत सोबत जोडली आहे.

राज्य निवडणूक आयोगाच्या संदर्भीय पत्रानुसार ग्रामपंचायत मतदानाच्या दिवशी संबंधित ग्रामपंचायतींमधील मतदारांना मतदानाचा हक्क बजावता येण्याच्या दृष्टीने भरपगारी सुटी/ विशेष सवलत देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांनी मतदान पुरावा म्हणून मतदान ओळखपत्र सादर करावे.

सर्व शैक्षणिक/प्रशासकीय विभागप्रमुखांनी सदर शासन निर्णय आपल्या अधिनस्थ शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या निदर्शणास आणून द्यावे.

विद्यापीठ प्रांगण, )(
औरंगाबाद- ४३१ ००४ )(
दि. १३-०१-२०२१ )(

**कुलसचिव**

या परिपत्रकाची प्रत माहिती व पुढिल कार्यवाहीस्तव :-

१. मा. संचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उपपरिसर, उस्मानाबाद.
२. सर्व शैक्षणिक विभागप्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
३. सर्व प्रशासकीय विभागप्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
४. संचालक, युनिक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना देऊन विनंती करण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.
५. जनसंपर्क अधिकारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.